 Exh. 13

174/25

रे.क.नं. १७१/२०२५

मे. दिवाणी न्यायाधिश सा ो, कनिष्ठ स्तर कागल

यांचेकोर्टात. . .




श्री. रमजान दादू शहाणेदिवान - वादी

विरुद्ध

१) श्री. इम्रान मौलाली शहाणेदिवान - प्रतिवादी

वगैरे

**दाव्याचे कामी जै-थे परिस्थिती ठेवणेकरिता अर्ज**

**यातील वादींचा विनंती अर्ज असा की,**

१) वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्या विरुद्ध कायम मनाई व हक्कज्ञापनाकरिता दाखल केला आहे.

२) दावा मिळकत ही वादीचे वडिलांचे नावे असणारी मिळकत असून सदर मिळकत वादीच्या वडिलांनी सन १९९३-९४ मधील ग्रा.पं.मि.नं. १२४/१/२/१ ही मिळकत आपले नावे तसेच ग्रा.पं.मि.नं. १२४/१/२/२ ही वादीचे नावे नोंद करुन मालकी हक्काने दिलेली मिळकत आहे. तसेच वादीच्या वडिलांनी ग्रा.पं.मि.नं. १२४/१/२/१ ही मिळकत वादीला मालकी हक्काने दिले आहे याचही कल्पना प्रतिवादी नं. १ ते ४ व रज्जाक दादु शहाणेदिवान यांना होती व आहे. त्यामुळे वादीचे वडिल हयात असतानाच प्रतिवादी नं. २ व ३ मयत ४ व रज्जाक यांनी स्वतंत्रपणे

Order
O.S.to say
C.J.J.D.Kagal

08/01/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

बाचणी गावामध्ये घरे बांधून आपल्या कुटूंबासह रहात आहेत. तेव्हा दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. ग्रा.पं.मि.नं. १२४/१/२/१ त्याचा चालुचा ग्रा.पं.मि.नं. २१५ असून ग्रा.पं.मि.नं. १२४/१/२/२ याचा ग्रा.पं.मि.नं. २१४ असा आहे. या दोन्ही मिळकती वादीकडे वहिवाटीस आहेत.

३) दावा गट नंबर २१४ व २१५ मध्ये वादीची जुने घरी होती. त्याठिकाणी वादीने ग्रा.पं.मि.नं. २१४ मध्ये शासनाच्या घरकुल योजनेतून वादीने नवीन घराचे बांधकाम करताना आपणास सदर घरामध्ये ये-जा करणेसाठी दक्षिण-उत्तर पुर्वेकडील बाजुस १०फुटी रस्ता ठेवून घराचे बांधकाम केलेले आहे. तसेच ग्रा.पं.मि.नं. २१५ मध्ये असलेले जुने घर त्याचा वापर वादी करत होते व आहेत. वादीचे वडिल हयात असेपर्यंत ग्रा.पं.मि.नं. २१५ व २०८ या मिळकतीस वादीच्या वडिलांच्या नावाची घरठाणपत्रकी नोंदी होत्या. मात्र प्रतिवादी नं. १ ते ३ व ४अ व ब यांनी प्रतिवादी नं. ५ यांना हाताशी धरुन वादीच्या अपरोक्ष ग्रा.पं.मि.नं. २१५ व ग्रा.पं.मि.नं. २०८ या मिळकतीमध्ये ग्रा.पं.मासिक सभा दिनांक २८/०९/२०२१ चा ठराव क्र. ४/१ ने वारस नोंद पोकळ करुन घेतलेचे वादींना नुकतेच समजून आले आहे. आणि प्रतिवादी नं. १ ने प्रतिवादी नं. २ च्या नावे ग्रा.पं.मि.नं. २१५ नोंद झाले ठिकाणी आपल्या नावाची नोंद करुन घेतलेचे वादींना समजून आले आहे तशा नोंदी करुन घेणेचा प्रतिवादी नं १ ते ४अ व ब यांना कोणताही हक्क नव्हता व नाही. तेव्हा प्रतिवादी नं. ५ ग्रा.पं.बाचणी यांनी वादी, प्रतिवादी नं. १ ते ४अ व ब

Umdale 28/01/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

यांची घरठाणपत्रकी केलेल्या वारसा नोंदी या बेकायदेशीर असून वादीवर बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होवून मिळावे तसेच तेव्हा प्रतिवादी नं. ५ ने ग्रा.पं. मासिक सभा दिनांक २८/०९/२०२१ चा ठराव क्र. ४/१ नुसार प्रतिवादी नं. १ ते ४अ व ब यांना कोणत्याही प्रकारे शासकिय मदत मंजुर करु नये अशी प्रतिवादी नं. ५ यांना मनाई आदेश करावा याही करिता वादीचा दावा आहे. सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी यांना नोटीस मिळालेली आहे. परंतु अद्यापही प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दिलेले नाही.

४) दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. १ व २ यांनी अंगबळाच्या जोरावर दिनांक ०२/१२/२०२५ इ. रोजी नवीन इमारतीचे बांधकाम करणेची आखणी केली म्हणून वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुद्ध दावा दाखल केला आहे. असे असताना प्रतिवादी यांनी पुन्हा दिनांक २०/१२/२०२५ इ. रोजी इमारतीच्या बांधकामासाठी खुदाई करुन पाया तीन फुट उंचीपर्यंत बांधत आणला आहे. तेव्हा प्रतिवादी यांना वादीने समजावून देखील प्रतिवादी ऐकत नाहीत उलट प्रतिवादी नं. १ व २ हे इतर प्रतिवादी यांच्या मदतीने इमारतीचे बांधकाम पुर्ण करणेच्या इराद्यात आहेत. तसेच प्रतिवादी नं. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये वादीचा ग्रा.पं.मि.नं. २१४ च्या समोर दक्षिण बाजुस रस्त्यापर्यंत १०फुट रूंदीचा रस्ता सोडलेला होता त्याच रस्त्यावर प्रतिवादी यांनी बांधकाम सुरु आहे. त्यामुळे वादींना आपल्या घराकडे येणे-जाण्यास अडचणीचे होणार आहे. तसेच प्रतिवादी यांना याकामी बांधकामास मनाई न झालेस वादीचे अपरिमित असे

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी यांनी नि. ५ तुर्तातुर्त मनाई अर्जाचा निकाल होईतोपर्यंत दावा मिळकतीमध्ये जै-थे परिस्थितीचा मे.कोर्टांनी आदेश केलेस प्रतिवादी यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. मात्र तसा आदेश न झालेस वादीस आपल्या मिळकतीमध्ये ये-जा करणेस तसेच इमारतीच्या बांधकामामुळे रस्त्याच्या जागेस व इतर जागेस मुकावे लागणार आहे म्हणून सदर कामी प्रतिवादी नं. १ व २ यांना नि. ५ चे आदेशापर्यंत जैसे-थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश करणेत यावा म्हणून प्रस्तुतचा आदेश देत आहे.

५) **तेव्हा वादींची विनंती की,**

अ) प्रस्तुत दाव्याच्या कामी व तुर्तातुर्त मनाई अर्जाचे कामी प्रतिवादी आपली कैफियत व म्हणणे देवून तुर्तातुर्त मनाई अर्ज निकाली होत नाही तोपर्यंत दावा मिळकतीमध्ये जैसे-थे परिस्थिती ठेवणेचा आदेश करावा ही विनंती.

ब) इतर अनुषंगीक हुकूम व दादी याच कामी वादींचे वतीने व्हावेत.

---------------------------

येणेप्रमाणे अर्ज असे,

R D S

कागल मे. जा. व्हावे

दिनांक ०८/०१/२०२६

Oundale 08/01/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

## ॲफ़िडेव्हीट

मी यातील वादी माझे नाव **श्री. रमजान दादू शहाणेदिवान, व.व. ७५,** धंदा- शेती, रा. बाचणी, ता. कागल, जि.कोल्हापूर शपथेवर ॲफ़िडेव्हिट करतो की, वरील लिहीले अर्जातील सर्व मजकूर माझे स्वतःचे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे आहे म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मुक्काम गारगोटी दि. ०८/०१/२०२६

मी ॲफ़िडेव्हीट करणार यांना ओळखतो

**(ॲड. एस.बी. पाटील)**

RDS

## प्रतिज्ञा

मी ॲफ़िडेव्हीट करणार सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील लिहीले ॲफ़िडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे स्वतःचे माहितीने व समजूतीने खरा व बरोबर आहे आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम गारगोटी,

दि. ०८/०१/२०२६

RDS

Solemnly Affirmed before me by
Shr
who is
identified by Shr S.B. Patil
whom I know personally.
Dated 08/01/2026
Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.01.08 17:40:36 +0530